26-01-2025-Dai-02_DH_PAN_28_04_2016-2.qxp 01/26/2025 12:00 AM Page 1



# सोशल मीडियाचा वापर जबाबदारीने करावा..!

## संचालक भूषण सावईकर : बोर्डा सरकारी महाविद्यालयात एक दिवसीय राष्ट्रीय परिषद उत्साहात

■ टीम दैनिक हेराल्ड

**साखळी, दि. २५** : सोशल मीडिया अर्थात सामाजिक माध्यमे आपला मौल्यवान वेळ वाया घालवतात आणि कधीकधी आपल्याला चुकीच्या मार्गावर नेतात. त्यामुळे सोशल मीडियाचा वापर जबाबदारीने आणि हेतुपुरस्सर करणे अत्यंत आवश्यक आहे, असे प्रतिपादन उच्च शिक्षण संचालनालयाचे संचालक भूषण सावईकर यांनी केले. गोवा सरकारच्या उच्च शिक्षण संचालनालयाच्या सहकार्याने बोर्डा येथील सरकारी महाविद्यालयाच्या (स्वायत्त ) अर्थशास्त्र विभागाने 'डिजिटल संवाद: सोशल मीडिया आणि समाज' या विषयावरील एक दिवसीय बहुविद्याशाखीय राष्ट्रीय परिषदेच्या समारोप सोहळ्यात प्रमुख पाहुणे या नात्याने बोलत होते. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ एफ. एम. नदाफ उपस्थित होते. परिषदेच्या समारोप सोहळ्याच्या सुरुवातीला प्राचार्य प्रा. (डॉ.) एफ. एम. नदाफ यांनी मान्यवरांचे स्वागत केले.




**बोर्डा : राष्ट्रीय परिषदेतील सहभागींना प्रमाणपत्र वितरित करताना उच्च शिक्षण संचालनालयाचे संचालक भूषण सावईकर. सोबत प्राचार्य डॉ एफ. एम. नदाफ व मान्यवर.**

त्यानंतर इंग्रजीच्या सहायक प्राध्यापिका डॉ. मोनिका पाटील यांनी परिषदेचा सविस्तर अहवाल सादर केला. प्रा. वेम्बली यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. डॉ. एलिझाबेथ यांनी आभार मानले. राष्ट्रगीताच्या सादरीकरणाने परिषदेचा समारोप झाला. या परिषदेच्या माध्यमातून बोर्डा सरकारी महाविद्यालयाने समाज आणि सामाजिक माध्यमे यातील परस्पर संबंध उलगडण्यासाठी या विषयांमधील शिक्षणतज्ज्ञ, संशोधक आणि विद्यार्थी यांना व्यासपीठ उपलब्ध करून दिले.

### शिक्षकांची जबाबदारी महत्त्वाची

**सोशल मीडियाचे रचनात्मक आणि हानिकारक पैलू ओळखण्यासाठी शिक्षकांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करावे. केवळ सकारात्मक परिणामांसाठीच सोशल मीडियाचा वापर करण्याची गरज सावईकर यांनी यावेळी अधोरेखित केली.**

### विद्यार्थी आणि प्राध्यापकांचा सर्वांगीण विकास : डॉ. नदाफ

**यावेळी डॉ.नदाफ म्हणाले की, बोर्डा सरकारी महाविद्यालय शैक्षणिक वातावरण समृद्ध करण्याबरोबरच विद्यार्थी आणि प्राध्यापकांच्या सर्वांगीण विकासात देखील योगदान देत आहे. बोर्डा सरकारी महाविद्यालय हे गोव्यातील एकमेव स्वायत्त महाविद्यालय आहे.**

पान १ वरून

### कला अकादमीबाबतचा टास्क फोर्सचा अहवाल बेदखल

ते एक महत्त्वपूर्ण दुर्लक्ष असल्याचे म्हटले. सप्टेंबर २०२४ मध्ये, कलाकार आणि विरोधी पक्षाच्या आमदारांकडून मोठ्या प्रमाणात टीका झाल्यानंतर, कला अकादमीच्या नूतनीकरणाचा आढावा घेण्यासाठी १२ सदस्यीय कृतीदल स्थापन करण्यात आले . या कृतीदलाने प्रकल्प अपयशी ठरल्याचे ध्वजांकित केले. तपासणीनंतर, समितीने इमारतीची अखंडता आणि कार्यक्षमता पुनर्संचयित करण्यासाठी प्रमुख शिफारसी आणि सुधारणांचा आराखडा सादर करणारा अहवाल सादर केला. कार्यदलाने हा विषय थेट मुख्यमंत्री सावंत यांच्याकडे उचलण्याची योजना आखली आहे, ज्यामध्ये दीर्घकालीन समस्या सोडवण्यासाठी त्वरित कारवाई करण्याची विनंती केली आहे.

# म्हापसा शिमगोत्सव समितीच्या अध्यक्षपदी जोशुआ डिसोझा

टीम दैनिक हेराल्ड

म्हापसा, दि. २४ : म्हापसा शिमगोत्सव समितीची नुकतीच बैठक होऊन समितीच्या अध्यक्षपदी उपसभापती जोशुआ डिसोझा तर कार्याध्यक्षपदी डॉ. गुरुदास नाटेकर यांची निवड करण्यात आली. यावर्षी म्हापसा येथे चित्ररथ मिरवणूक रविवार दि. २३ मार्च आयोजित करण्यात आली असून बाकीचा कार्यक्रमाची रूपरेषा लवकरच जाहीर करण्यात येणार आहे. निवडलेली इतर समिती पुढीलप्रमाणे : उपाध्यक्ष : डॉ. नूतन बिचोलकर, वरिष्ठ उपाध्यक्ष : डॉ. तारक आरोलकर, कार्यकारी उपाध्यक्ष: आनंद भाईडकर, बार्बरा कॅरास्को, शशांक नार्वेकर, कायल ब्रागांझा, शुभांगी वायगणकर, किशोरी कोरगावकर, आशीर्वाद खोर्जुवेकर, प्रिया मिशाळ, कमल डिसोझा, स्वप्नील शिरोडकर, विराज फडके, अन्वी कोरगावकर, सुधीर कांदोळकर, प्रकाश भिवशेट, ( नगरसेवक, म्हापसा नगरपालिका ), ४) सरचिटणीस : साईनाथ राऊळ, उपचिटणीस : सुशांत हरमलकर, खजिनदार: यशवंत ( बाबा ) गवंडळकर, उपखजिनदार : चंद्रशेखर बेनकर व विकास आरोलकर, सल्लागार समिती : राजेंद्र ग. पानकर, प्रसन्ना बुर्ये, मोहन पु. काणेकर, दामोदर (बाबू) नाटेकर, विलास पानकर, सुशांत पेडणेकर, अवधूत स. नार्वेकर, महादेव सा. नाटेकर, अनिल भर्तू, शिवानंद म. धावजेकर, दिनेश पानकर, सभासद : अजित मांद्रेकर,सागर श्री. नार्वेकर, अच्युत वेर्णेकर, रमेश रा. शेट मणेरकर, सुहास सिरसाट, अभी गवंडळकर, सागर गो. नाईक, विनायक दिवकर, भालचंद्र नाटेकर, संजय मिशाळ, महेश भिवशेट, सोमनाथ नाईक, विशांत पानकर, सोमनाथ नाटेकर, निळकंठ शेट, मिलिंद महाले, भारत तोरस्कर, दत्ताराम (बाप्पा) नाटेकर, कुंदल नाटेकर, हर्षद स्वार, सलील शिरोडकर, यशवंत शेट्ये, रोहित नाटेकर, उदय मुंज, गुरुदास वायगणकर, श्यामसुंदर पेडणेकर ,प्रज्योत खेडेकर,योगेश खेडेकर, साईश सावंत, सागर कांबळी, अनिश जोशी, संदेश सिरसाट, चंदन गोपी नाईक, नितीन पेडणेकर, राजेश शेट्ये, दुर्गेश तिळणेकर, गौरेश पेडणेकर, सिद्धाशु साळवी, राजेश तुयेकर, सिद्धांत परब, रितेश मणेरकर, सिद्धार्थ बोरकर, सप्रेष कलंगुटकर, पूर्णय रिवणकर, श्रेयश वराडकर, संदेश रेडकर, प्रथमेश वायगंणकर, भावेश आरोलकर, रवींद्र फोगेरी,विवेक नाटेकर,अमेय नाटेकर, दीपक तिळवे, अरुण गावंडळकर, विनोद पालयेकर, वरूण नाईक, बबल धारगळकर, भानुदास गडेकर, सनी कळंगुटकर, प्रेमानंद आर्लेकर, सिद्धार्थ शेट, प्रशांत सरवणकर. प्रसिद्धी समिती : प्रकाश धुमाळ, नारायण राठवड, सुदेश आर्लेकर, रमेश नाईक, तुषार टोपले, अनिल लाड, गिरीश मांद्रेकर, प्रसाद म्हाम्बरे, आग्नेल परेरा, उमेश झर्मेकर, रेणुका तालेगावकर, अर्पिता श्रीवास्तव, संदीप कामूलकर, प्रसाद पिंगुळीकर, शामसुंदर फडते, बाबू पिंगुळीकर, योगेश मिराशी, कमलाकर हुमरस्कर, प्रकाश गडेकर, सौरव शिरोडकर, गौतम शिरोडकर, डॅनव्हर डिसोझा, भारत बेतकेकर, नितिक्षा गावकर, अस्मिता पोळजी, साईप्रसाद कुबडे, सागर लवंदे, स्नेहा हसोटीकर



# चावडी बाजारात टेलरिंग दुकानाला आग

■ टीम दैनिक हेराल्ड

**काणकोण, दि. २५ :** चावडी, काणकोण बाजारात असलेल्या एका टेलरिंग दुकानाला शनिवारी दुपारी आग लागून बरेच नुकसान झाले. काणकोण अग्निशामक दलाच्या जवानांनी घटनास्थळी धाव घेऊन आग आटोक्यात आणली. आगीत कपडे, शिलाई मशीन तसेच अन्य शिलाई वस्तू जळून खाक झाल्याची माहिती काणकोण अग्निशामक दलाच्या कार्यालयातून देण्यात आली. रोहिदास वेळीप यांचे हे दुकान आहे. काणकोण पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला.

# 'काणकोण शिमगोत्सवा'च्या अध्यक्षपदी सभापती रमेश तवडकर

■ टीम दैनिक हेराल्ड

**आगोंद, दि. २५:** काणकोण शिमगोत्सव मंडळाची बैठक गुरुवारी नगर्से, चार–रस्ता, येथील आपत्कालीन आसरा सभागृहात होऊन यंदाच्या २०२५ च्या शिमगोत्सव समिती अध्यक्षपदी स्थानिक आमदार तथा सभापती रमेश तवडकर यांची निवड करण्यात आली. कार्याध्यक्ष म्हणून नगरसेवक गंधेश मडगावकर यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

यावेळी नगराध्यक्ष सारा देसाई, मुख्याधिकारी रमेश गावकर, नगरसेवक गंधेश मडगावकर, रमाकांत नाईक गावकर, लक्ष्मण पागी, हेमंत नाईक गावकर, अमिता पागी, सायमन रिबेलो तसेच नम्रता प्रभुदेसाई आदी उपस्थित होते.

सुरुवातीला नगराध्यक्ष देसाई यांनी स्वागत केले. सिद्धार्थ देसाई यांनी गतवर्षाचा शिमगोत्सव मंडळाचा अहवाल सादर केला. त्यानंतर यंदाच्या शिमगोत्सव मंडळाची नवीन समिती निवडण्यात आली. निवडलेली समिती पुढीलप्रमाणे : स्वागताध्यक्ष : सारा देसाई, उपाध्यक्ष : प्रशांत देसाई, शंकर नाईक, बबेश बोरकर, सिद्धार्थ देसाई, सुभाष महाले, व रमाकांत बांदेकर, सचिव : अनिल फळदेसाई, खजिनदार : मंगेश फळदेसाई यांची निवड करण्यात आली.

यावेळी पत्रकार अजित पैंगीणकर, सुभाष महाले, पत्रकार संघाचे अध्यक्ष बबेश बोरकर, सिद्धार्थ देसाई, शिरीष पै, विनय तुबकी, नारायण देसाई, अनिल फळदेसाई, मंगेश फळदेसाई, मनोज नाईक गावकर, गुरु ऊर्फ पुंडलिक नाईक गावकर यांनी झालेल्या चर्चेत भाग घेतला.



**नगर्से : आसरा सभागृहात आयोजित बैठकीत उपस्थित नगराध्यक्ष सारा देसाई, रमेश गावकर, गंधेश मडगावकर, रमाकांत नाईक गावकर, हेमंत नाईक गावकर, अमिता पागी, लक्ष्मण पागी, नम्रता प्रभुदेसाई व अन्य.**

# केपे सरकारी महाविद्यालयात भारतकार हेगडेदेसाई जयंती उत्साहात

## विविध उपक्रमांचे आयोजन; मराठी विभागाचा पुढाकार

■ टीम दैनिक हेराल्ड

**पर्वरी, दि. २५** : मराठी विभाग, शासकीय महाविद्यालय केपे, गोवा मराठी अकादमी पणजी, भारतकार हेगडे देसाई प्रतिष्ठान, केपे यांच्या संयुक्त विद्यमाने भारतकार हेगडे देसाई जयंतीनिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले होते. कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी प्रमुख वक्ते म्हणून प्रा.कुलदीप कामत तर अध्यक्षस्थानी प्राचार्य अनिल सामंत, महाविद्यालयाचे प्राचार्य जयदीप भट्टाचार्य, विशेष निमंत्रित म्हणून गोवा मराठी अकादमीचे केपे तालुका प्रतिनिधी दीपक देसाई, भारतकार हेगडेदेसाई प्रतिष्ठानचे विशेष निमंत्रित यतीन हेगडे देसाई, मराठी विभाग प्रमुख सारिका आडविलकर आणि मराठी विभाग प्रभारी प्रा.दीप्ती फळदेसाई आदी मान्यवर उपस्थित होते. महाविद्यालयाच्या गानवृंदाने सादर केलेल्या स्वागत गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. मान्यवरांच्याहस्ते दीपप्रज्वलन करून झाल्यानंतर भारतकार हेगडेदेसाई यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. बीए.भाग दोन मधील विद्यार्थिनी सपना पवार हिने मान्यवरांचा परिचय करून दिला.



यावेळी मराठी अकादमीचे अध्यक्ष प्राचार्य अनिल सामंत, प्रा.कुलदीप कामत, यतीन हेगडे देसाई यांची मनोगते झाली. भक्ती पाटील यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. तर आभार प्रा. सोनिया सावंत यांनी मानले. कार्यक्रमाच्या प्रारंभी भारतकार हेगडेदेसाई यांच्या समाधीस्थळी जमून त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

**प्रा.कुलदीप कामत यांचे बहुमूल्य मार्गदर्शन**

प्रा.कुलदीप कामत यांनी 'भारतकारांचा वारसा आणि आपण' या विषयावर बहुमूल्य मार्गदर्शन केले. काळाची गरज ओळखून त्यांनी विद्यार्थ्यांपुढे विविध प्रश्न ठेवत भारतकारांच्या विचारसरणीचे विविध पैलू मांडले.

**भारतकारांचे अग्रलेख डिजीटल स्वरूपात मिळणार**

भारतकार हेगडेदेसाई यांचे भारत हे नियतकालिक व त्यातील अग्रलेख सर्वांना उपलब्ध व्हावेत व सर्वांना ते हाताळता यावेत म्हणून डिजिटल स्वरूपात रूपांतरित करण्यात आलेले आहेत, अशी माहिती यावेळी भारतकार हेगडेदेसाई प्रतिष्ठानचे विशेष निमंत्रित यतीन हेगडे देसाई यांनी दिली.

**किरण सुतार आणि गौरी गावकर यांचा गौरव**

दरवर्षी महाविद्यालयातून मराठी विषय घेऊन विशेष प्रावीण्य मिळविणाऱ्या दोन विद्यार्थ्यांचा भारतकार हेगडे देसाई प्रतिष्ठानतर्फे गौरव करण्यात येतो. यंदा या गौरवाचे मानकरी किरण सुतार आणि गौरी गावकर ठरले. त्यांनी हा किताब स्वीकारला.



**सावईवेरे : मधलावाडा येथील धालोत्सवात सहभागी महिला व बच्चे मंडळी.**

# धालो गीते, नृत्यासह सावईवेरेतील धालोत्सव साजरा

■ टीम दैनिक हेराल्ड

**सावईवेरे, दि. २५ :** 'धालो गे बाये धालोनी खेळूया गे ' अशी पारंपरिक धालो गीते गात व धालो नृत्याबरोबरच फुगडी घालीत मधलावाडा – सावईवेरे येथील पाच दिवसीय धालोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. पौष महिन्यात मधलावाडा येथील धालो मांडावर वार्षिक धालोत्सवाला प्रारंभ होतो. या मांडावर पाच रात्री धालोत्सव साजरा होतो. यंदाही मांडावर तुळशी वृंदावनाची पूजा करून धालोत्सवास प्रारंभ झाला. या वाड्यावरील महिला धालोत्सवात उत्साहाने सहभागी होतात. धालोत्सवाच्या शेवटच्या रात्री महिलांसाठी तसेच बाल गोपाळांसाठी विविध स्पर्धा संपन्न झाल्या. शिवाय रंभा अवसार, सावज, नवरदेव मिरवणूक, मयूर इत्यादी कार्यक्रमही झाले. या भागातील महिलांना धालोत्सव ही एक पर्वणीच असते.

# दुर्गंधीयुक्त कचऱ्याचे स्तोम बंद करा, अन्यथा ठाण मांडून बसणार

**▶ चेअरमन ॲड. खलप : मांद्रेतील कचरा समस्यांची आरोग्य खात्याकडून पाहणी**

■ टीम दैनिक हेराल्ड

**हरमल, दि. २५** : येथील मांद्रे कॉलेज परिसरात असलेल्या पंचायतीच्या कचरा संकलन शेडच्या बाबतीत आवश्यक उपाययोजना न केल्यास या ठिकाणी ठाण मांडून बसण्याचा इशारा संस्थेचे चेअरमन ॲड. रमाकांत खलप यांनी दिला.

विकास परिषद मांद्रे संस्थेने अनेकदा पंचायतीस निवेदन दिले असून त्याचा पाठपुरावा केला. मात्र योग्य प्रतिसाद मिळत नसल्याने नाराजी आहे. कॉलेजमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना दररोज दुर्गंधी व कचऱ्याच्या पाण्याशी सामना करावा लागतो. अनेकदा विद्यार्थी घसरून पडून जखमी झाली आहेत. पंचायतीनेही याकडे लक्ष घालण्याची मागणी केली आहे.



**मांद्रे : मांद्रे कॉलेज रस्त्यावरील दुर्गंधीयुक्त कचऱ्याचे स्तोम बंद केल्यास निर्वाणीचा इशारा देताना चेअरमन ॲड. रमाकांत खलप. सोबत कंत्राटदार व आरोग्य खात्याचे अधिकारी परब**

देशाचा कायदामंत्री व या भागातील जनतेने सहा वेळा आमदारपदी निवडून दिले. त्या संस्थेचा चेअरमन आहे, या भागातील विद्यार्थी शिक्षण घेतात,त्यामुळे दुर्गंधीयुक्त कचरा बंद न केल्यास ज्याठिकाणी येऊन बसायला मागेपुढे पाहणार नसल्याचे ॲड. खलप यांनी सांगितले.

दरम्यान, त्याचवेळी मांद्रेचे सरपंच मिगेल फर्नांडिस पोचले असता, याची कल्पना पंचायतीला आहे. कालच आम्ही निर्णय घेतला आहे, ही दुर्गंधीयुक्त कचरा संकलन अन्य जागी करण्यास सांगितले आहे. आमदार जीत आरोलकर यांच्याशी नेहमीच पाठपुरावा चालू असून, कचरा प्रकल्प व स्मशानभूमी या दोन समस्या सोडवण्यासाठी आपले प्राधान्य असल्याचे सरपंच फर्नांडिस यांनी सांगितले. त्यावेळी तूये आरोग्य केंद्राचे सॅनिटरी अधिकारी परब यांनी पाहणी केली.

# रेषा माशेलकर उद्यानाच्या कामाची आमदार आर्लेकरांकडून पाहणी

■ टीम दैनिक हेराल्ड

**पेडणे, दि. २५** : पेडणे पालिका क्षेत्रातील रेषा माशेलकर हे उद्यान पांढरा हत्ती बनत असतानाच परत एकदा वन खात्यामार्फत या उद्यानाचे सुशोभीकरण १७ लाख खर्च करून केले जाते. त्याची पाहणी पेडणे मतदार संघाचे आमदार प्रवीण आर्लेकर यांनी पालिका मंडळाच्या व वनखात्याच्या अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत केली.



**पेडणे : गार्डन पाहणी करताना आमदार प्रवीण आर्लेकर व इतर.**

पेडणे पालिकेच्या मालकीचे हे उद्यान सध्या पांढरा हत्ती बनत चालला आहे. या उद्यानावर आतापर्यंत एक कोटी पेक्षा जास्त खर्च सरकारने केला. मागच्या वेळी या गार्डनचा खर्च केला होता आणि त्यात साधन सुविधा उपलब्ध करताना मनोरंजनाची साधनेही उपलब्ध होती. ती लवकर कशी बिघडली? आणि एक कोटीपेक्षा जास्त खर्च केलेल्या गार्डनची दशा आणि दुर्दशा करण्यास कोण जबाबदार आहे? असा सवाल स्थानिक पत्रकारांनी यावेळी लोकप्रतिनिधीलाही उपस्थित केला.

आमदार प्रवीण आर्लेकर यांनी या उद्यानाच्या सुशोभीकरणाची पाहणी करताना नगराध्यक्ष मनोज हरमलकर, उपनगराध्यक्ष विशाखा गडेकर, माजी नगराध्यक्ष तथा नगरसेविका उषा नागवेकर, नगरसेविका राखी कशालकर , नगरसेविका तृप्ती सावळ, माजी नगराध्यक्ष तथा नगरसेवक शिवराम तुकोजी, पेडणे भाजपा मंडळ अध्यक्ष तथा नगरसेवक सिद्धेश पेडणेकर, माजी नगराध्यक्ष तथा नगरसेवक माधव सीनाई देसाई, नगरसेविका आश्विनी अरविंद पालयेकर, माजी उपनगराध्यक्ष विश्राम गडेकर, मोपा सरपंच सुबोध महाले, उमेश तळवणेकर आदी नागरिक उपस्थित होते.

मागच्या वेळ सरकारने या उद्यानावर ७० लाखांपेक्षा जास्त खर्च करून अर्धवट स्थितीत असलेल्या उद्घाटनाचे हे काम केले होते. त्यानंतर पुन्हा एकदा या उद्यानाची विकास करण्याच्या नजरेतून सरकारने प्रयत्न करून आतापर्यंत करोडो रुपये या उद्यानावर खर्च केले. त्यानंतर पुन्हा आता १५ ते १७ लाख खर्च करून वनखात्याअंतर्गत या उद्यानाचे सुशोभीकरण करण्याचे काम सुरू आहे. त्या कामाची पाहणी आमदार आर्लेकर यांनी करत असताना स्थानिक पत्रकारांनी त्यांना या उद्यानाविषयी वेगवेगळे प्रश्न विचारून छेडले. त्यावेळी आमदार आर्लेकर यांनी सांगितले की, या उद्यानाचे सध्याचे काम लाखांमध्ये सुरू आहे. हे काम चांगले व्हावे, अशी सूचना आपण वनखात्याच्या अधिकाऱ्यांनाही दिलेली आहे. या उद्यानाची देखभाल भविष्यात वनखातेच करेल, असे ते म्हणाले.